# निसर्ग

## आनंदमय जन्मदिवसाप्रीत्यर्थ प्रस्तुत
## श्रीगुरुमाईंसमवेत घडलेले काही प्रसंग

### श्रीगुरुमाईंसमवेतचा प्रसंग : १

*लीलावती स्टुअर्ट*

अलीकडेच, श्रीगुरुमाई अनुग्रह इमारतीच्या अमृत कोर्टयार्डमधून जात होत्या. कोर्टयार्डमध्ये उपस्थित असलेल्या काही सेवाकर्त्यांशी बोलण्यासाठी त्या थांबल्या. आम्ही अत्यंत प्रेमाने व आदराने त्यांना अभिवादन केले. त्यानंतर श्रीगुरुमाईंनी आम्हाला निसर्गातील एका लहानशा जीवाबरोबर थोड्याच वेळापूर्वी झालेल्या त्यांच्या एका सुंदर संवादाविषयी सांगितले.

श्रीगुरुमाई म्हणाल्या की, त्या एका खिडकीतून बाहेर पाहत होत्या, जिच्या काही भागावर अर्धपारदर्शक काच बसवलेली होती. त्या अर्धपारदर्शक भागावर त्यांना एक सुंदर, मोठा, चंदेरी रंगाचा पतंग दिसला, ज्याच्या पंखांवर अगदी बारीक नक्षी होती. तो पतंग खिडकीच्या बाहेरील बाजूने काचेवरून वर चढण्याचा प्रयत्न करत होता. तो थोडासा वर चढायचा आणि मग तो खाली घसरायचा; तो थोडासा वर चढायचा आणि खाली घसरायचा. श्रीगुरुमाईंनी सांगितले की, अडचणीत सापडलेल्या त्या पतंगाची ही अवस्था त्या बारकाईने पाहत होत्या. अखेरीस, श्रीगुरुमाई पतंगाला म्हणाल्या, “तुझ्या परीने तू इतकेच करू शकतोस का?” श्रीगुरुमाईंनी असे म्हणताच तो पतंग उडून गेला!

श्रीगुरुमाईंनी प्रसन्नमुद्रेने आमच्याकडे पाहिले व स्मितहास्य करत त्या म्हणाल्या, “त्या पतंगाला हे दाखवून द्यायचे होते की, त्याच्याकडे देण्यासाठी आणखी खूप काही आहे!” श्रीगुरुमाईंनी समजावून सांगितले की, त्या पतंगाने जेव्हा हे आव्हान ऐकले—तेव्हा तो त्या आव्हानाला समर्थपणे सामोरा गेला; त्याला त्याच्या सर्वश्रेष्ठ क्षमतेचे स्मरण झाले आणि मुक्तपणे उडण्यासाठी त्याला त्याचे स्वतःचे पंख मिळाले. श्रीगुरुमाई म्हणाल्या, “पतंगाच्या बाबतीत घडलेला हा प्रसंग एक अतिशय सुंदर शिकवण आहे. लोक संघर्ष करतात आणि आपण बांधले गेलो आहोत असे त्यांना वाटते. ते कोणत्या गोष्टीला बांधले गेले आहेत?” श्रीगुरुमाईंनी वळून आकाशाकडे आणि बगिच्याकडे पाहिले व त्या म्हणाल्या, “निसर्ग नेहमीच इतकी सुंदर उदाहरणे प्रस्तुत करत असतो.”

हा प्रसंग ऐकून मी भारावून गेले, त्याबरोबरच मी श्रीगुरुमाईंप्रति कृतज्ञ होते की, त्यांनी ही घटना अन्य सेवाकर्त्यांना व मला सांगितली. श्रीगुरुमाई अवघ्या निसर्गाशी किती एकरूप आहेत याचे हे एक अतिशय सुंदर उदाहरण आहे आणि आपल्यामध्ये किती महानता आहे या गोष्टीची आठवण हा प्रसंग मला करवून देतो.

***

## श्रीगुरुमाईंसमवेतचा प्रसंग : २

*गरिमा बोरवणकर*

वर्ष २०१७ मध्ये, श्रीगुरुमाईंच्या जन्मदिनाच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजे रविवार २५ जून, रोजी काही सेवाकर्ते आणि मी श्रीगुरुमाईंसमवेत नित्यानंद सरोवराच्या सभोवतालच्या परिसरात फेरफटका मारण्यासाठी निघालो होतो.

आम्ही सरोवराच्या वरच्या बाजूच्या रस्त्याने चालू लागलो, त्यानंतर थोड्याच वेळात, श्रीगुरुमाई थांबल्या आणि विरुद्ध दिशेच्या टेकडीकडे पाहू लागल्या. सुमारे दोनशे फूट दूर असलेल्या एका झाडाकडे त्यांनी अंगुलीनिर्देश केला आणि त्या म्हणाल्या, “त्या छोट्याशा झाडावर बसलेला तो लाल पक्षी पाहा.” आम्ही सर्वांनी तिकडे पाहिले. झाडावर बसलेल्या छोट्याशा लाल पक्ष्याचे ते दृश्य मंत्रमुग्ध करणारे होते. श्रीगुरुमाईंनी मला विचारले की, मी तो पक्षी पाहिला का आणि मी उत्साहाने उत्तर दिले, “होय गुरुमाई, मी पाहिला ना!” मग आम्ही पुन्हा आमच्या वाटेने चालू लागलो.

काही वेळाने श्रीगुरुमाईंनी वरती ढगांमध्ये तयार झालेल्या एका हृदयाच्या आकाराकडे अंगुलीनिर्देश केला. आम्ही सर्वजण तो हृदयाकार पाहण्यासाठी थांबलो आणि तो पाहून आम्हाला खूपच आनंद झाला.

आम्ही आणखी काही अंतर चालत गेलो. श्रीगुरुमाई पुन्हा थांबल्या आणि त्यांनी रस्त्यात सरळ उभ्या असलेल्या एका छोट्या लंबगोलाकार दगडाकडे अंगुलीनिर्देश केला, ज्याची लांबलचक सावली रस्त्यावर पडली होती. श्रीगुरुमाईंनी सांगितले की, त्यांना अशा लहान-लहान दगडांच्या सावल्या पाहायला फार आवडते.

त्या छोट्याशा दगडाचे अचूक संतुलन तसेच त्याची इतकी लांबवर पडलेली सावली पाहणे हे खरोखरच आश्चर्यकारक होते. मी विचार केला, *श्रीगुरुमाईंनी जर याकडे लक्ष वेधले नसते, तर रस्त्याच्या बाजूला पडलेल्या अनेक दगडांपैकी या एका छोट्याशा दगडाकडे माझे लक्ष कधीच गेले नसते. मी त्याच्या जवळून सरळ पुढे निघून गेले असते.*

आम्ही पुढे चालत राहिलो आणि चालता-चालता आमचे लक्ष अनेकानेक सुंदर गोष्टींकडे जाऊ लागले : ढगांचे आकार बदलत होते आणि त्यातून आणखी हृदयाकार निर्माण होत होते, अनेक चतुर कीटक, काळ्या ढगांमागून चहूकडे होणारी सूर्यकिरणांची उधळण—आकाशाला लावलेली ती चंदेरी झालरच जणू! माझ्या हे लक्षात आले की, निसर्गातील या सुंदर रूपाकारांशी जोडली गेल्याने मला अंतरी किती प्रफुल्ल आणि उत्साहपूर्ण वाटत होते.

त्याच दिवशी संध्याकाळी, एका प्रशांत क्षणी, मी श्रीगुरुमाईंसोबत फेरफटक्याच्या दरम्यान व्यतीत केलेले ते सुमधुर क्षण पुन्हा एकदा अनुभवत होते. त्यावेळी, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवरील नेचर गॅलरी, कम्युनिंग विथ नेचर आणि ‘निश्चिन्तता’ यांसारख्या गॅलरीजमधील अनेक छायाचित्रे आणि व्हिडिओ अचानक माझ्या मनश्चक्षूंसमोर तरळू लागले.

श्रीगुरुमाईंच्या नजरेतून निसर्ग न्याहाळल्यानंतर, मला असे जाणवले की, वर्तमान क्षणात उपस्थित राहण्यासाठी मी जेव्हा आवर्जून प्रयत्न करते, तेव्हा मला निसर्गाच्या त्या चमत्कारांची अधिकाधिक अनुभूती होते, जे चमत्कार निसर्ग सदैव आपल्यासमक्ष प्रकट करत असतो.

© २०१७ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.